# पहिली खबर
# FIRST INFORMATION REPORT

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता - २०२३ च्या कलम १७३ अंतर्गत (Under Section 173 B.N.S.S.-2023)

1. राज्य State: महाराष्ट्र जिल्हा District: मुंबई पोलीस ठाणे Police Station: ला.प्र.वि. पहिली खबर क्र. FIR No.: 28 वर्ष Year: 2025 दिनांक Date: 20/09/2025

2. (i) अधिनियम Act: भ्र.प्र. अधि. (सुधारित) 1988 कलमे Sections: 7
   (ii) अधिनियम Act ........ कलमे Sections ........
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ........

3. (a) अपराधाची घटना : Occurrence of offence : वार Day ........ तारीख पासून Date from: 16/09/25 वेळ Time: 7:30 तारीख पर्यंत Date to: 19/09/25 वेळ Time: 14:05

वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा (Tick applicable portion).

(1) ००.०० ते ०३.०० (2) ०३.०० ते ०६.०० (3) ०६.०० ते ०९.०० (4) ०९.०० ते १२.०० (5) १२.०० ते १५.००
(6) १५.०० ते १८.०० (7) १८.०० ते २१.०० (8) २१.०० ते २४.००

(b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date: 19/09/2025 वेळ Time: 10.00 वा.

(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No.: 02/25 तारीख Date: 20/09/2025 वेळ Time: 01.30

4. माहितीचा प्रकार Type of Information ........ लेखी / तोंडी Written / Oral: लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S.: उत्तरेस 15 कि.मी. चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. Chouki / Beat / O. P. Name and No. ........

(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name: घनकचरा व्यवस्थापन विभाग, नवपाडा, महानगर गॅस पंपासमोर एल. बी. एस. रोड, ठिकाणाचे नंबर No. if any ........ गल्ली Ward ........ रस्त्याचे नाव Name of road ........
जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place: कुर्ला (प), गाव Village: मुंबई. पोस्ट Post ........ तालुका Taluka ........ जिल्हा Dist. ........ राज्य State ........

(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे. चे नाव In case, outside the limit of this Police Station ........ तालुका Taluka ........ जिल्हा Dist. ........ राज्य State ........

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.

(a) नाव Name: कोली खोडा बारिया
(b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name: खोडा बारिया
(c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age: 52 वर्षे
(d) राष्ट्रीयत्व Nationality: भारतीय फोन नं. Phone No.: 9022129120
(e) पारपत्र क्रमांक Passport No.: — दिल्याचा दिनांक Date of issue: — दिल्याचे ठिकाण Place of Issue: —
(f) व्यवसाय Occupation: नोकरी
(g) धर्म Religion: हिंदु जात Caste: अ.जा. जनजात Sub-Caste: मेघवाल
(h) पत्ता Address ........ गल्ली/सर्व्हे नं. Ward ........ घर/नाव नं. House Name No. ........ फोन/मो. नं. Phone No. ........ पॅन नं. Pan No. ........ वोटर्स नं. Card No. ........
बी/933, रामदेव नगर, जे. आर. बोरिचा मार्ग, चिंचपोकळी,
रस्त्याचे नाव Road ........ जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place ........ गाव Village ........ पोस्ट Post ........ पो. स्टे. P. Stn. ........
तालुका Taluka ........ जिल्हा Dist.: मुंबई राज्य State: महाराष्ट्र सध्याचा पत्ता Present Address: वरीलप्रमाणे

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता ( आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा. ) ( संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे. )

Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

सुरेश मारुती सरकुळे, वय - 45 वर्षे, धंदा - नोकरी. रा. डी. बी/१५, नर्मदा व्हॅली, कावेरी पार्क, 3 रा मजला, नेतीवली नाका, कल्याण (पूर्व) ठाणे.



Scanned with OKEN Scanner

जबाब दिनांक २०/०९/२०२५

श्री. कांती खोडा बारीया, वय ५२ वर्षे, धंदा – हलालखोर (सफाई कामगार), कामगार – बृहन्मुंबई महानगर पालिका, घनकचरा व्यवस्थापन विभाग, हजेरी चौकी कमानी नौपाडा, एल.बी.एस. रोड, एल वॉर्ड, कुर्ला (प), मुंबई ४०००७० राठी – सी/१३३, रामदेव नगर, जे. आर. बोरीया मार्ग, मुंबई ४०००११ मोबाईल क्रमांक ९०२२१२९१२०, आधारकार्ड क्रमांक ७०३८९७४५५२८८.

———oooo———

मी वरीलप्रमाणे असून वर नमुद पत्त्यावर माझे जन्मापासुन राहावयास आहे. मी वर नमुद ठिकाणी माझी आई, पत्नी व माझी दोन मुले आणि बहिणींसह राहतो. मी बृहन्मुंबई महानगर पालिका, घनकचरा व्यवस्थापन विभाग, हजेरी चौकी कमानी नौपाडा, एल.बी.एस. मार्ग, एल वार्ड, कुर्ला (प), मुंबई येथे हलालखोर (सफाई कामगार) म्हणून कर्तव्य करीत आहे.

मी सन १९९५ मध्ये बृहन्मुंबई महानगरपालीकेमध्ये ड्रेनेज डिपार्टमेन्ट (गटार सफाई) विभागात कामाला रूजू झालो. सन १९९७ मध्ये माझी बदली ड्रेनेज डिपार्टमेन्ट (गटार सफाई) येथून हलालखोर (सफाई कामगार) या विभागात एल वार्ड येथे करण्यात झाली. मला तात्पुरत्या स्वरूपात कामावर कामगार म्हणून रूजू करण्यात आले होते. त्यानंतर मला सन २००७ मध्ये कायमस्वरूपी रूजू करण्यात आले. मी ड्रेनेज डिपार्टमेन्ट (गटार सफाई) विभागात काम करत असताना माझ्या कमरेला दुखापतीचा त्रास होवू लागला. त्यावर मी नायर हॉस्पीटल येथे उपचार घेतले आहेत. मला डॉक्टरांनी ऑपरेशन करण्याचा सल्ला दिला आहे. मला सध्याही कर्तव्य बजावताना कंबरदुखीचा त्रास होतो.

मी दिनांक १६/०९/२०२५ रोजी घनकचरा व्यवस्थापन विभाग, नौपाडा चौकी येथे कर्तव्यावर असताना माझे वरिष्ठ श्री. सुरेश सुरकुले यांनी मला आमच्या विभागातील फिनीक्स मॉल, कुर्ला, मुंबई येथील रस्त्यावर साफसफाई करणा–या श्रीमती छायाबाई (सफाई कामगार) या दिनांक ३०/०९/२०२५ रोजी सेवानिवृत होत असल्याचे सांगून त्या सेवानिवृत्त झाल्यानंतर दिनांक ०१/१०/२०२५ रोजी पासून मला फिनीक्स मॉल, कुर्ला येथील रस्त्यावर साफसफाई करावी लागेल असे सांगितले. मी त्यांना मला कंबरदुखीचा त्रास असल्याने साफसफाई करण्यासाठी माझ्यासोबत आणखी एक कामगार देणेबाबत तसेच नौसेना विभागातील, एल.बी.एस मार्ग, कुर्ला येथील फिक्स रस्त्यावर साफसफाई करण्याचे कर्तव्य राहू देण्याबाबत विंनती केली. त्यांनी मला काम न करता घरी थांबण्याकरिता दरमहा रूपये ७,०००/– किंवा एकदाच रूपये १५,०००/– देवून सफाई कामाकरीता फिक्स रोड घ्या असे बोलून माझ्याकडे लाचेची मागणी केली. मी ऐवढे पैसे देण्यास मला जमणार नाही, मला तेथेच राहू दया, अशी विनंती केली. त्यावर ते काही बोलले नाहीत. मग मी तेथून निघून आलो. मला श्री. सुरेश सुरकुले यांना लाचेची रक्कम देण्याची इच्छा नसल्याने मी दिनांक १९/०९/२०२५ रोजी त्यांच्याविरुध्द लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी, मुंबई येथे समक्ष हजर राहुन स्वहस्ताक्षरात लेखी तक्रार दिली.

मी दिलेल्या तक्रारीवर कारवाई करण्याकरीता लाचलुचपत प्रतिबंधक विभागातील स.पो.आ अजित सुळे व पोलीस निरीक्षक मोहन जगदाळे यांची नेमणुक करण्यात आली. दिनांक १९/०९/२०२५ रोजी मी दिलेल्या लेखी तक्रारीवर पंचासमक्ष पडताळणी करण्यात येणार असल्याचे मला सपोआ अजित सुळे यांनी सांगितले. सपोआ सुळे मला पंचासह ला.प्र.वि, कार्यालयाच्या गोपनीय कक्षात घेवून गेले. त्या ठिकाणी माझे, सपोआ सुळे

समक्ष

( अजित सुळे )
सहाय्यक पोलीस आयुक्त
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग मुंबई

Baiyahu
कांती खोडा बारीया

Scanned with OKEN Scanner

व पंचाचे वक्तव्य रेकॉर्ड केले. त्यानंतर सपोआ सुळे व पोनि जगदाळे यांनी मला व पंचाना पडताळणी कारवाई दरम्यान खबरदारीच्या आवश्यक त्या सुचना दिल्या. सपोआ सुळे यांनी माझी ओळख पोलीस सापळा पथकसोबत करून दिली व आम्ही सर्व पोलीस वाहनात बसून अॅन्टी करप्शन कार्यालयातून बाहेर पडून वरळी सी लिंक रोड वरून एल.बी.एस. मार्ग कुर्ला येथील फिनिक्स मॉल येथे पोहोचलो. तेव्हा १२.३५ वाजले होते.

आम्ही तेथे पोहचल्यावर मला सपोआ सुळे यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर लावून पंच क्र. १ यांच्या सोबत लोकसेवक सुरेश सुरकुले यांच्या भेटीकरीता कमानी नौपाडा चौकीत पाठविले. मी तेथे पोहचलो त्यावेळी तेथे लोकसेवक सुरेश सुरकुले उपस्थित नव्हते परंतू स्टोअर किपर मिलींद घाडीगावकर उपस्थीत होते. मी स्टोअर किपर मिलींद घाडीगावकर यांना सुरेश सुरकुले सरांबाबत विचारणा केली असता त्यांनी ते बाहेर गेले असून अजून चौकीत परत आले नाहीत असे सांगितले. तसेच सुरेश सुरकुले यांची बॅग ही येथे चौकीत आहे म्हणजे ते परत चौकीत येतील असे सांगितले. त्यामूळे मी माझे मोबाईल नंबर ९०२२१२९१२० वरून लोकसेवक सुरेश सुरकुले यांना त्यांचे मोबाईल नंबर ८०९७७०११३१ वर संपर्क केला. तेव्हा आमच्यामध्ये कामा संदर्भात बोलणे झाले व लोकसेवक सुरेश सुरकुले यांनी मला चौकीमध्ये येत असून थांबण्यास सांगितले. सदर संभाषण डिजिटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये रेकॉर्ड झाले. त्यानंतर मी व पंच नं.१ तेथून निघुन सपोआ सुळे व पोनि जगदाळे हे बसलेल्या फिनिक्स मॉलसमोर साईलिला रेस्टॉरन्टमधील ए.सी. सेक्शनमध्ये आलो व सपोआ सुळे तसेच पोनि जगदाळे यांना लोकसेवक सुरेश सुरकुले हे कामाकरीता बाहेर गेले असून ते थोडयावेळात येणार असल्याचे सांगितले.

थोडयावेळाने सपोआ सुळे यांनी पुन्हा डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करून माझे शर्टच्या आतील बनियनला लावला. मी सपोआ सुळे यांच्या सुचनेप्रमाणे पंच क्र. १ श्री इंगोले यांचे सोबत लोकसेवक यांना भेटण्याकरीता चौकीमध्ये जात असताना चौकीच्या बाहेरच माझी लोकसेवक सुरेश सुरकुले यांचेसोबत भेट झाली. त्यावेळेस आमच्या मध्ये चर्चा झाली व चर्चे दरम्यान मी लोकसेवक सुरेश सुरकुले यांना मागणी केलेली रक्कम कमी करण्यास सांगितले असता, लोकसेवक श्री सुरेश सुरकुले यांनी मला "पुरा हि देदो" असे सांगून माझेकडे रूपये ८,०००/- इतक्या लाचेची मागणी केली. सदरचे बोलणे झाल्यानंतर आम्ही तेथून परत आलो. पोनि जगदाळे यांनी आम्हास फिनिक्स मॉलच्या समोर असलेल्या नाज रेस्टॉरन्टमधील ए.सी. सेक्शनमध्ये येण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी व पंच नाज रेस्टॉरन्टमधील ए.सी. सेक्शनमध्ये आलो. तेथे सपोआ सुळे व पोनि जगदाळे यांनी व्हॉईस रेकॉर्डरमार्फत मायक्रो एस.डी. कार्डमध्ये ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण ऐकले असता त्यामध्ये लोकसेवक सुरेश सुरकुले यांनी माझेकडे रूपये ८,०००/- इतक्या लाचेची स्पष्ट मागणी केली असल्याचे समजून आले.

त्यानंतर सपोआ सुळे यांनी सापळा पथकास, पंचास व मला सापळा कारवाईच्या अनुषंगाने घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. तसेच मी आणलेल्या लाचेची रक्कम रूपये ८,०००/- ला अॅन्थ्रोसिन पावडर लावण्यात आली व ती रक्कम माझे शर्टाच्या डाव्या खिश्यात ठेवली. त्यानंतर सपोआ सुळे यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालू करून मला व पंच क्र. ०१ श्री इंगोले यांना लोकसेवक श्री सुरेश सुरकुले यांना भेटणेकामी नौपाडा चौकी जवळ पाठविले. तेथे माझी लोकसेवक श्री सुरेश सुरकुले यांचेसोबत भेट झाली तेव्हा माझेमध्ये व लोकसेवक श्री सुरेश सुरकुले यांचेमध्ये कामाबाबत चर्चा झाली. चर्चे दरम्यान लोकसेवक श्री सुरेश सुरकुले यांनी पुन्हा माझेकडे लाचेच्या रक्कमेची मागणी केली असता, मी माझे शर्टाच्या खिशामधील लाचेची रक्कम लोकसेवक श्री सुरेश सुरकुले यांचे समोर धरली असता, लोकसेवक श्री सुरेश सुरकुले यांनी सदरची लाचेची

समक्ष

(अजित सुळे)
सहाय्यक पोलीस आयुक्त
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग मुंबई

Bariya
कांती खोडा बारीया.

Scanned with OKEN Scanner

रक्कम स्विकारली व मला ''किती आहे, पाच'' असे विचारले असता मी त्यांना ''आठ हजार है पुरा'' असे बोललो तेव्हा लोकसेवक श्री सुरेश सुरकुले यांनी सदरची लाचेची रक्कम हि त्यांचे पॉकेटमध्ये ठेवून पॉकेट टेबलावर ठेवले. त्यानंतर आम्ही चौकीच्या बाहेर येवून लोकसेवकाने लाचेची रक्कम स्विकारल्याबाबत मी सापळा पथकास दिसेल अशाप्रकारे पुर्वनियोजीत इशारा केला. त्यानंतर लागलीच जवळपास असलेल्या सापळा पथकाने चौकीमध्ये जावून लोकसेवक सुरेश सुरकुले यांना दुपारी ०२.०५ वा. ताब्यात घेतले.

तरी लोकसेवक सुरेश सुरकुले यांनी दिनांक १६/०९/२०२५ रोजी यांनी मला प्रकृती अस्वस्थेच्या कारणास्तव घरीच थांबण्याकरीता दरमहा रूपये ७,०००/– किंवा एकदाच रूपये १५,०००/– देवून सफाई कामाकरीता फिक्स रस्ता घ्या असे बोलून माझेकडे लाचेची मागणी केली होती. सदरबाबत आज दिनांक १९/०९/२०२५ रोजी केलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक सुरेश सुरकुले यांनी माझेकडे रूपये ८,०००/– इतकया लाचेची मागणी करून सदरची रक्कम माझेकडून स्विकारली म्हणून माझी लोकसेवक सुरेश सुरकुले यांचे विरोधात कायदेशीर तक्रार आहे.

माझी फिर्याद मराठीत संगणकावर टंकलिखीत केलेली असून ती मला मराठीत वाचून व हिंदीतून समजावून सांगितली असून ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष

(अजित सुळे)
सहायक पोलीस आयुक्त
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

कांती खोडा बारिया

तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ...तात्काळ गुन्हा दाखल करण्यात आला...

Reasons for delay in reporting by the complainant/informant

चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील ( आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा ) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

(a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकुण मूल्य ......—......

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ......—......

Unnatural / Accidental Death Case No., if any.

पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत ( आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा ) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील रकाना क्र.1 मधील आलोसे हे बि.एम.सी., एल वार्ड, कुर्ला, मुंबई येथे घनकचरा व्यवस्थापन विभागात क. पर्यवेक्षक पदावर लोकसेवक म्हणून कार्यरत आहेत. दिनांक २६/०८/२५ रोजी नमुद आलोसे यांनी त्यांच्या अधिपत्याखालील हलालखोर पदावर कार्यरत फिर्यादी यांना प्रकृती अस्वस्थतेच्या कारणास्तव घरीच थांबण्याकरीता २०,०००/- प्रतिमहा किंवा एकदाच २५०००/- रुपये देऊन सफाई कामाकरीता फिक्स रस्ता देण्याकरीता लाचेची मागणी केली होती. आज दि. १९/०९/२५ रोजी पडताळणी केली पडताळणी दरम्यान आलोसे यांनी रु.८०००/- लाचेची मागणी केली व फिर्यादी यांच्याकडून ती लाचेची रक्कम स्विकारली म्हणून कलम ७ भ्र.प्र. अधिनियम प्रमाणे गुन्हा नोंद.

**केलेली कार्यवाही** -1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा : ...अजित सुळे, स.पो.आ., ला.प्र.वि., मुंबई...

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण, ......

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ...... जिल्हा ...... राज्य ......

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O) ...... Rank ...... No. ...... to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ......

(3) Transferred to P. S. ......
District ...... on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ informant, free of cost.
(R.O.A.C.)

4. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression of the Complainant/Informant

[signature]

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer in-charge, Police Station

[signature]

संपूर्ण नाव Name ...अजित सुळे...

पदनाम Rank ...सहाय्यक पोलीस आयुक्त...

तपासिक अ. चा कोड क्र. ...लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई...

Posting

Code No. of I. O. ......

5. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख ...20/09/2025...
1. Date and time of submitted to the Court.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रत | 2. फिर्यादी, | 3. पोलीस अधीक्षक (संगणक), | 4. तपासिक अंमलदार, | 5. स्थळ प्रत. |
| Copy to | 2. Complainant, | 3. Supdt. of Police (Computer), | 4. Inv. Officer, | 5. Office Copy. |

Attachment to item 7 of First Information Report

Scanned with OKEN Scanner